**महाराष्ट्र शासन**
**उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया**
११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया
ईमेलdmmugondia@gmail.com फोन नं ०७१८२ - २३६६२०

---

**जा.क्र. म.रा.ग्रा.जी.अ./गो/ 339 /२०१७** **दिनांक - 06/06/२०१७**

**वाहने भाडे तत्वावर घेण्याबाबत**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहायाने दिनदयाळ अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी गोदिया जिल्हयात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. अभियानांतर्गत स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघ निर्माण करणे तसेच विविध प्रशिक्षण/ कार्यशाळेचे आयोजन मोठयाप्रमाणात करण्यात येत आहे. त्याकरिता समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) यांना विविध गावांमध्ये प्रवास करावा लागत आहे. सदर प्रवासाकरिता वेळोवेळी आवश्यकतेनुसार लागणारे TATA SUMO/ SCORPIO/ TAVERA/ BOLERO/ INOVA किंवा इतर वाहने भाडे तत्वावर घेण्यास्तव एक वर्ष कालावधीसाठी Frame work agreement करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन मर्यादित ई-निविदा (Limited e-tender) प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादाराकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate),
२. http://mahatenders.gov.inया संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा. (पत्रात login Id नमुद करावे किंवा संकेत स्थळाचा login Id असलेला स्क्रिन शॉट सादर करावे )
३. Shop And Estabeshment Act अंतर्गत नोंदणी किंवा इतर सक्षम प्राधिकारी अंतर्गत नोंदणी किंवा नगरपंचायत/ ग्रामपंचायत कडुन वाहने भाडे तत्वावर पुरविण्याचा व्यवसाय करण्यासाठी परवानगी/ ना हरकत प्रमाणपत्र.
४. PAN कार्ड असावे.
५. स्वत: च्या मालकीचा कमित कमी १ अवातानुकुलीत वाहन, ८+ १ आसन क्षमता असलेला १ जोनवारी २०१0 किंवा त्यानंतर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (वाहनाचा नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे)

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या पुरवठादाराकडुन वाहन भाडे तत्वावर पुरविण्याकरिता १ वर्ष कालावधीकरिता करार करण्यासाठी त्यांनी त्यांच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणीकृत केलेला Login Id तसेच क्र. २ व ५ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया या पत्यावर दिनांक 06 /०७/२०१७ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा.सदर अर्ज procurementgondia@gmail.com या ईमेल वर सुध्दा सादर करता येवू शकेल. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादार यांच्याकडून कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही.

**जिल्हा अभियान संचालक**
**उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,**
**गोंदिया**